महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड

(पुणे मेट्रो रेल प्रकल्प)

## पिंपरी चिंचवड शहराची वाटचाल आता स्मार्ट सिटी कडे - डॉ. ब्रिजेश दीक्षित

पुणे १६ : अद्धयावत तंत्रद्धनाने परिपूर्ण स्मार्ट मेट्रो पुणेकरांच्या जीवनशैलीत आमुलाग्र बदल घडवेल, असा विश्वास महा मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. ब्रिजेश दीक्षित यांनी व्यक्त केला. पिंपरी चिंचवड महानगरपालिका ज्यू. इंजिनिअर्स असोसिएशन तर्फे शनिवारी भोसरी येथील, अंकुश राव लांडगे सभागृह येथे भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरया यांच्या जयंती प्रित्यर्थ आयोजित अभियंता दिनानिमित्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून डॉ. दीक्षित बोलत होते.

तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात झपाट्याने बदल घडून येत आहेत. या तंत्रज्ञानाचा शहराच्या विकासात योग्य उपयोग करण्याचे आव्हान अभियंत्यापुढे आहे. पाषाण युग, कृषी युग,औद्योगिक युग,माहितीचे युग हे टप्पे ओलाढून आज आपण ज्ञानाच्या युगात पोहोचलो आहे. पुणे मेट्रो रेल प्रकल्पात नाविन्यपूर्ण बाबींवर भर देऊन अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग केल्या जात आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने आज वर उत्तम दर्ज्याचे कार्य आणि विविध पप्रकल्पाची चांगल्यारीत्या या ठिकाणी उभारणी केली आहेत, पिंपरी चिंचवड महानगरपालिका देशात अग्रगण्य असून मेट्रो रेल प्रकल्पाचे निर्माण या ठिकाणी

होत असून आता शहराची वाटचाल स्मार्ट सिटी कडे अग्रेसर आहे. पिंपरी चिंचवड या ठिकाणी आता पर्यंत मेट्रो रेल प्रकल्पाचे ३०% वाह्याडक्ट चे कार्य कमी वेळेत पूर्ण झाले असून या रिच ची कार्य झपाट्याने आणि उत्तम गुणवत्ता पूर्वक पद्धतीने केल्या जात आहे,कुठल्याही प्रकारच्या गुणवतेला तडजोड करून केली जाणार नाही हे प्रामुख्याने डॉ. दीक्षित यांनी सांगितले.

पुणे मेट्रो रेल प्रकल्प हा जगातील नागपूर मेट्रो नंतर दुसऱ्या क्रमांकाचा मेट्रो प्रकल्प असणार आहे ज्या ठिकाणी सोलर एनर्जी चा उपयोग सुरवातीपासूनच केल्या जात आहे.  पिंपरी चिंचवड शहरची ओळख औद्योगिक आणि ग्रीन सिटी म्हणून देशात ख्यात आहे व या ठिकाणची ६ मेट्रो स्थानकांचे निर्माण देखील ह्या बाबीं लक्षात घेऊन सर्वान करिता उपयुक्त अशी स्थानके निर्माण केली जाणार.

मेट्रो रेल प्रकल्पासारखे मोठे प्रकल्प खूप कमी प्रमाणात बघायला मिळतात आणखी अश्या प्रकल्पा मुळे अभियंता ना देखील बरेच काही शिकण्यासारखे आहे. मेट्रो प्रकल्पाचे कार्य करतांना उद्भवलेल्या आव्हानाची उहापोह करतांना देशातील प्रकल्प वेळेत पूर्ण होण्याचे प्रमाण अत्यल्प असल्याचे ते म्हणाले. म्हणूनच मेट्रो प्रकल्प उभारणीचे हे काम व्यवस्थापन क्षेत्रातले एक मोठे आव्हान होते आणि ते पेलण्याकरता महा मेट्रोने कंबर कसली या निमित्याने प्रकल्प व्यवस्थापन या विषयांवर भर देत  प्रकल्पाच्या उभारणी करिता ५ डी- बीम सारख्या संकल्पना राबवित आहे.

पुण्यातील मेट्रो प्रकल्प पूर्णत्वास गेल्यानंतर शहरांचा कायापलट होणार असून या निमित्याने पुणेकरांना निर्भेळ वातावरणाचा आनंद लुटता येईल. नागपूर आणि पुणे प्रकल्पाचे काम वेगाने सुरु असतांना संपूर्ण देशाचा विचार केल्यास याबाबतीत राज्य देखील आघाडी वर असल्याचे डॉ. दीक्षित म्हणाले. एकूणच मेट्रो प्रकल्पाच्या वैशिष्ट्यांचा उल्लेख करतांना डॉ. दीक्षित यांनी मेट्रोचे स्थानके आणि इतर अनोख्या बाबींचा उल्लेख केला. पांरपारिक उर्जा स्त्रोतांचा वापर टाळत महा मेट्रोने सौर उर्जेच्या वापरावर भर दिला असून, प्रकल्पाच्या विविध बांधकामाच्या ठिकाणी सोलर पॅनेल ची उभारणी करून त्यातून निर्मित होणाऱ्या सौर उर्जेचा वापर महा मेट्रो करणार आहे. प्रकल्पाची उभारणी करतांना महा मेट्रोने आवश्यक त्या सर्व निकषाचे पालन केले असून एक अत्याधुनिक आणि आंतरराष्ट्रीय दर्ज्याच्या मेट्रो सेवेची निर्मिती या माध्यमाने महा मेट्रो करीत आहे.

मेट्रोचा हा प्रकल्प टीम वर्कच्या माध्यमातून होत असल्याचे सांगत पराजित होणाऱ्या संघात विजेता हा कोण्ही नसतो तसेच जीकनाऱ्या संघात कोण्ही हि पराजित नसतो असे म्हणत त्यांनी कार्यक्रमात उपस्थित असलेल्या अभियंताना सांगिक बळाचे महत्व पटवून दिले.

पुणे शहरात मेट्रो रेल्वेचे एकूण ३१.२५४ किंमी लांबीच्या दोन मार्गावर एकूण ३० स्थानके राहणार आहेत. कमीत कमी खर्चात प्रकल्प साकारण्यावरभर देण्यात येत असून  देशातील अन्य प्रकल्पाच्या त्रुटी लक्षात घेऊन त्या टाळण्यात येईल. या प्रकल्पात सिग्नलिंग व वाहतुकीची व्यवस्था स्वयंचलित राहणार आहे. सीसीटीव्हीच्या माध्यमातून सुरक्षेच्या विषयावर लक्ष दिले जाईल. फिडर बससेवा, तिकीटांसाठी  स्मार्टकार्ड,कॉमन मोबिलीटी कार्ड आदी अध्यावत सुविधा प्रवाशांना उपलब्ध करून दिल्या जातील. बांधकामाशी संबंधित माहिती व कामावर नियंत्रण ठेवणे सहज शक्य झाले आहे.

महापौर श्री. राहुल जाधव :  पिंपरी चिंचवड महानगरपालिका द्वारे शहराची रचना उत्तमरीत्या केली असून,येथील अभियंत्यांनी चिकाटीने चांगले काम व सुंदर असे शहर बनविले आहे. शहर घडविण्यास सर्वांचे योगदान अमुल्य असून शहरातील रस्ते,उड्डाणपूल जगाच्या नकाशावर आहे. आता मेट्रोचे निर्माण कार्य या ठिकाणी होत असून आपण हे शहर जगाच्या इतिहासावर स्मार्ट असे शहराचे निर्माण करुया व या करता आपल्या सर्वांच्या सहकार्याची अपेक्षा आहे असे उद्गगार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे महापौर श्री. राहुल जाधव यांनी अभियंत्यांना यांना संबोधित करताना म्हटले.

आयुक्त श्री. श्रावण हर्डीकर : पिंपरी चिंचवड या ठिकाणी आतापर्यंत जी काही जडण-घडण झाली त्यामध्ये अभियंता यांचे मौल्याचे योगदान आहे. बी.आर.टी., नाशिक फाटा उड्डाणपूल,मुंबई पुणे हायव्हे च्या निर्माण मध्य अभियंता यांनी आपल्या कामाचा ठसा उमटविला असून रीवर फ्रंट, प्रधानमंत्री आवास योजनाणा आता पुढे नेऊन नवा ठसा निर्माण करायचा असून उर्जेवर बचत करणारी पद्धत वापरण्याकरिता अभियंताना पुढे याव लागेल अशी उद्घोषणा पिंपरी चिंचवड

**महानगरपालिका आयुक्त श्री. श्रावण हार्डीकर यांनी अभियंता दिना निमित्य व्यक्त केली.**

**या प्रसंगी शिक्षण समितीच्या सभापती प्रा. सोनाली गव्हाणे, पिंपरी चिंचवड महानगरपालिका ज्यू. इंजिनिअर्स असोसिएशन चे अध्यक्ष श्री.जय गुजर,शहर अभियंता श्री. राजन पाटील,सह शहर अभियंता श्री. आयुब खान पठान,श्री.प्रवीण तुपे, कार्याध्यक्ष श्री. सुनील बडगावकर,सचिव श्री. संतोष कुंदळे प्रामुख्याने उपस्थित होते.**